# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय** :- प्रभाग समिती क्र 05 च्या कार्यक्षेत्रातील पावसाळयापुर्वी मुख्य व अंतर्गत रस्ते डांबरीकरणाने (पॅचवर्क पध्दतीने) दुरुस्ती करणे

**प्रभाग समिती क्र 05 च्या कार्यक्षेत्रातील पावसाळयापुर्वी मुख्य व अंतर्गत रस्ते डांबरीकरणाने (पॅचवर्क पध्दतीने) दुरुस्ती करणे**.कामी रक्कम रु. ४९,५०,६७२/- मात्रच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४ दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार प्रशासकिय ठराव व निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक सो. यांना आहेत.

ठराव क्र. ३९५ दिनांक :- ०६/०३/२०२४

**प्रभाग समिती क्र 05 च्या कार्यक्षेत्रातील पावसाळयापुर्वी मुख्य व अंतर्गत रस्ते डांबरीकरणाने (पॅचवर्क पध्दतीने) दुरुस्ती करणे**..कामी रक्कम रु. ४९,५०,६७२/-. मात्रच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी **अजय वैद्य**, प्रशासक तथा आयुक्त, **प्रभाग समिती क्र 05 च्या कार्यक्षेत्रातील पावसाळयापुर्वी मुख्य व अंतर्गत रस्ते डांबरीकरणाने (पॅचवर्क पध्दतीने) दुरुस्ती करणे**.कामी रक्कम रु. ४९,५०,६७२/- - मात्रच्या कामाच्या प्रस्तावास मा.प्रशासकीय ठरावाची मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना**

**विषय :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत करावयाच्या विकास कामांच्या प्रस्तावास मा.जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय मान्यतेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मागाास वर्गीय वस्तीमध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत मा.ना.श्री.कपिल मोरेश्वर पाटील, राज्य मंत्री, पंचायत राज मंत्रालय भारत सरकार, यांनी दि.२६ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, ठाणे यांच्याकडे ठाणे जिल्ह्यातील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत ७ विकास कामांना मंजूरी देऊन रक्कम रुपये रु. ६७,४९,८३९/- निधी उपलब्ध करुन देण्याची मगाणी केली असून सहाय्यक आयुक्त समाज कल्याण , ठाणे यांनी .ना.श्री.कपिल मोरेश्वर पाटील, राज्य मंत्री, पंचायत राज मंत्रालय भारत सरकार, यांनी प्रस्तावित केलेल्या ७ विकास कामांना निधी देणेकामी शासन निर्णयानुसार अटी व शर्तीची पुर्तता पूर्ण करीत असून रु. ६७,४९,८३९/-अंदाजपत्रकीय रक्कमेचे प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत. त्यास शहर अभियंता, मुख्यलेखा परिक्षक, मुख्य लेखा वित्त अधिकारी, अतिरिक्त आयुक्त यांची शिफारस आहे.

शासन आदेश क्र. एमसीओ. २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४. दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी मा.प्रशासक नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार सदरच्या प्रस्तावास मंजुरी करण्याचा करण्याचे अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त यांना आहेत. त्यानुसार सदरच्या खालील प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे प्रशासकीय मान्यतेकरीता पाठववयाची असल्याने त्यास मंजुरी मिळणेकामी सादर.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | भिवंडी मनपा वार्ड क्र.१६ आसबीबी प्रेमनगर येथे गटार व पायवाट तयार करणे. | ९,९९,०८३/- |
| २ | प्रभाग समिती क्र.५ मधील खडकरोड येथिल दत्तु गायकवाड यांच्या घरासमोरील गटार व पायवाट तयार करणे. | ९,९७,६००/- |
| ३ | वार्ड क्र.१ मेनका गांधीनगर, संगमपाडा झोपडपट्टी येथिल साठे यांच्या घराजवळ गटार व पायवाट तयार करणे. | ९,९९,५६६/- |
| ४ | मनपा कार्यक्षेत्रातील पुर्व क्षेत्रातील मागासवर्गीय वस्ती मध्ये दोन चाकी फायबर कचराकुंडी उपलब्ध करुन देणे बाबत. | ९,९७,६००/- |

| | | |
|---|---|---|
| ५ | वार्ड क्र.१४ गोंविद नगर मधील बोध्द मंदिरासमोर विठ्ठल बुवा चाळ येथे गटार व पायवाट बनविणे. | ९,९९,८५४/- |
| ६ | मनपा कार्यक्षेत्रातील पश्चिम क्षेत्रातील मागासवर्गीय वस्ती मध्ये दोन चाकी फायबर कचराकुंडी उपलब्ध करुन देणे बाबत. | ७,५६,८००/- |
| ७ | भिवंडी मनपा कार्यक्षेत्रातील पश्चिम विधानसभा क्षेत्रातील मागासवर्गीय वस्ती मध्ये आसन व्यवस्था पुरविणे. | ९,९९,३३६/- |
| | **एकुण रक्कम रुपये** | ६७,४९,८३९/- |

**ठराव क्र.** ३८४ **दिनांक :-** ६/०३/२०२४

मा.ना.श्री.कपिल मोरेश्वर पाटील, राज्य मंत्री, पंचायत राज मंत्रालय भारत सरकार, यांनी दि.२६ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, ठाणे यांच्याकडे उपरोक्त सादर केलेली एकुण ७ विकास कामे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेच्या निकषात बसत असून उपरोक्त नमूद कामाची निकड लक्षात घेता सदर योजने अंतर्गत विकास कामे करणेकामी विभागाने शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एम.सी.ओ.२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि- १४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिनिशमनपा उपरोक्त नमूद ७ प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे प्रशासकीय मंजुरी करीता पाठविणेस मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)

**प्रशासक तथा आयुक्त**

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

## भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
## बांधकाम विभाग

**प्रेषकः- मा.आयुक्त सो.**
**प्रतिः- नगरसचिव**

**प्रस्तावना**
**गोषवारा**

**विषय:- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र.१ अंतर्गत वॉर्ड क्र.३ येथील पोगाव इंडस्ट्रीयल झोन येथे आर.सी.सी.रोड बनविणे. (महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकास याजने अंतर्गत)**

मे.सादर,

उपरोक्त विषयांकित कामी **अंदाजपत्रकीय रक्कम रु.९८,७६,१२०/-** मात्र करिता ई - निविदा सुचना क्र.१४७ /२०२३-२४ टेंडर नं. ९८७४८१ अन्वये दिनांक २३/०१/२०२४ ते ३०/०१/२०२४ या कालावधीत बी-१ पध्दतीची ई निविदा मागविण्यात आली आहे. या कामी ५ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. दिनांक ३१/१/२०२४ रोजी लिफाफा १ तांत्रिक बीड उघडण्यात आली. सदरच्या निविदांचे निविदा समितीने कागदपत्रांची छाननी अंती २ निविदाकारांचे दस्तऐवज पुर्ण असल्यामुळे २ ही निविदा,निविदा समितीने पात्र ठरविण्यात आल्या. व १) मे.बुबेरे ॲण्ड असोसिएट्स,भिवंडी २) मे.झा.पी.ॲण्ड कंपनी,उल्हासनगर ३) मे.शेख आरीफ इश्तियाक या तिन निविदाकारांचे कागदपत्र अपुर्ण असल्याने निविदा समितिने त्यांना अपात्र ठरविण्यात आले. उर्वरीत दोन निविदा पात्र ठरविण्यात आले असून लिफाफा २ फायनानशियल बीड दिनांक ०७/०२/२०२४ रोजी उघडली असून त्याचा तौलनिक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदेतिल दर (टक्केवारी) | निविदेतील दराची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | **मे.हिंदुस्तान इंटरप्रायजेस, भिवंडी** | **अंदाजपत्रकीय दराने** | **९८७६१२०.१९१** |
| २ | मे.चंडीका कंन्स्ट्रक्शन, भिवंडी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०० टक्के जादा दराने | **९९७४८८१.३९३** |

वरील पैकी **मे.हिंदुस्तान इंटरप्रायजेस,भिवंडी** यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच **अंदाजपत्रकीय दराचे रक्कम रु.९८,७६,१२०/-**(अक्षरी- अठ्ठयान्नव लाख शहात्तर हजार एकशे वीस रु.)मात्र खर्चाची निविदा करणे कामाच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये संविदा करणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्र.** ३९३ **दिनांक :-** ०६/०३ **/२०२४**

मे.हिंदुस्तान इंटरप्रायजेस,भिवंडी यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची रक्कम रु.९८,७६,१२०/- (अक्षरी- अठ्ठयान्नव लाख शहात्तर हजार एकशे वीस रु.) मात्र च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामाच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश कमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४ दिनांक ०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ(१ अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला

....२/-

प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मो.अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त,भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, वॉर्ड क्र.३ येथील पोगाव इंडस्ट्रीयल झोन येथे आर.सी.सी.रोड बनविणे या कामी सर्वात कमी दराचे निविदा मे.हिंदुस्तान इंटरप्रायजेस, भिवंडी यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

( अजय वैद्य )
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

**विषय :- साठेनगर येथील अण्णाभाऊ साठे सभागृहामध्ये दुसऱ्या मजल्यावर मुक्ता साळवे वाचनालय सुरु करणेबाबत.**

**संदर्भ :- माजी नगरसेविका श्रीमती साखराबाई गेणू बगाडे यांचे दिनांक ०६/०३/२०१९ चे पत्र**

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये माजी नगरसेविका श्रीमती साखराबाई गेणू बगाडे यांचे दिनांक ०६/०३/२०१९ चे पत्र प्राप्त झाले असून त्यामध्ये त्यांनी साठेनगर येथील अण्णाभाऊ साठे सभागृहामध्ये दुसऱ्या मजल्यावर मुक्ता साळवे वाचनालय खोलून त्या वाचवनालयामध्ये सर्व महापुरुषांचे ग्रंथ उपलब्ध करुन द्यावेत अशी मागणी केली आहे.

त्यानुसार वाचनालय विभागाने दिनांक १६/०१/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता अण्णाभाऊ साठे सभागृहाच्या दुसऱ्या मजल्यावर अंदाजे १९.५चौ.फुट X ३४चौ.फुट = ६६३चौ.फुट बांधकाम क्षेत्राची एक खोली वाचनालयाकरिता राखून ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले. सदर ठिकाणी अंदाजे ४० ते ५० वाचक क्षमतेची व्यवस्था होऊ शकते. माजी नगरसेविका श्रीमती साखराबाई गेणू बगाडे यांच्या मागणीनुसार सर्व महापुरुषांचे ग्रंथ या ठिकाणी उपलब्ध करुन दिल्यास तसेच तेथील मुलांकरिता एम.पी.एस.सी. व यु.पी.एस.सी. स्पर्धा परिक्षांची पुस्तके उपलब्ध करुन दिल्यास त्यांचे उपयोगी येणार आहे. वाचनालय सुरु करणेकामी खालीलप्रमाणे व्यवस्था करुन घ्यावी लागणार आहे.

| अ.क्र. | आवश्यक बाबी | व्यवस्था करुन घ्यावयाचे विभाग |
|---|---|---|
| १ | पुस्तके खरेदी करणे अथवा इतर वाचनालयांतील पुस्तके वर्ग करणे | वाचनालय विभाग |
| २ | टेबल, खुर्च्या, फर्नीचर ची व्यवस्था करणे | बांधकाम विभाग |
| ३ | कर्मचारी नियुक्ती करणे | आस्थापना विभाग |
| ४ | शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे | पाणीपुरवठा / विद्यूत विभाग |
| ५ | सीसीटीव्ही बसविणे | विद्यूत विभाग |
| ६ | सुरक्षा कर्मचारी नियुक्त करणे | सुरक्षा विभाग |

तरी, या ठिकाणी वाचनालय सुरु करणेकामी मा. प्रशासक तथा आयुक्त यांचा ठराव होणेकामी प्रस्ताव मा.प्रशासक तथा मा. आयुक्त सो यांचे मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक :-** ३९२ **दिनांक -** ५/०३/२०२४

माजी नगरसेविका श्रीमती साखराबाई गेणू बगाडे यांचे दिनांक ०६/०३/२०१९ चे पत्र प्राप्त झाले असून त्यामध्ये त्यांनी साठेनगर येथील अण्णाभाऊ साठे सभागृहामध्ये दुसऱ्या मजल्यावर मुक्ता साळवे वाचनालय खोलून त्या वाचवनालयामध्ये सर्व महापुरुषांचे ग्रंथ उपलब्ध करुन द्यावेत अशी मागणी केली आहे.

त्यानुसार वाचनालय विभागाने दिनांक १६/०१/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली असता अण्णाभाऊ साठे सभागृहाच्या दुसऱ्या मजल्यावर अंदाजे १९.५चौ.फुट X ३४चौ.फुट = ६६३चौ.फुट बांधकाम क्षेत्राची एक खोली

वाचनालयाकरिता राखून ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले. सदर ठिकाणी अंदाजे ४० ते ५० वाचक क्षमतेची व्यवस्था होऊ शकते. माजी नगरसेविका श्रीमती साखराबाई गेणू बगाडे यांच्या मागणीनुसार सर्व महापुरुषांचे ग्रंथ या ठिकाणी उपलब्ध करुन दिल्यास तसेच तेथील मुलांकरिता एम.पी.एस.सी. व यु.पी.एस.सी. स्पर्धा परिक्षांची पुस्तके उपलब्ध करुन दिल्यास त्यांचे उपयोगी येणार आहे. त्याअनुषंगाने खालील तक्त्यात नमुद आवश्यक बाबींची पुर्तता त्यांचे नावासमोर दिलेल्या विभागांनी करावयाची आहे.

| अ.क्र. | आवश्यक बाबी | व्यवस्था करुन घ्यावयाचे विभाग |
|---|---|---|
| १ | पुस्तके खरेदी करणे अथवा इतर वाचनालयांतील पुस्तके वर्ग करणे | वाचनालय विभाग |
| २ | टेबल, खुर्च्या, फर्नीचर ची व्यवस्था करणे | बांधकाम विभाग |
| ३ | कर्मचारी नियुक्ती करणे | आस्थापना विभाग |
| ४ | शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे | पाणीपुरवठा / विद्यूत विभाग |
| ५ | सीसीटीव्ही बसविणे | विद्यूत विभाग |
| ६ | सुरक्षा कर्मचारी नियुक्त करणे | सुरक्षा विभाग |

मला प्राप्त महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग २) नवि, १४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियामातील तरतुदी विशेष कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, श्री. अजय वैद्य, प्रशासक, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, वाचनालय विभाग प्रमुख, उपआयुक्त (वाचनालय) व अतिरिक्त आयुक्त १ यांनी शिफारस केलेनुसार प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक,**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय :- प्रभाग समिती क्र ०५ च्या कार्यक्षेत्रातील अन्वर बुबेरे सांस्कृतिक केंद्रावर पत्राशेड टाकणे व दुरुस्ती करुन रंगरंगोटी करणे.**

प्रभाग समिती क्र ०५ च्या कार्यक्षेत्रातील अन्वर बुबेरे सांस्कृतिक केंद्रावर पत्राशेड टाकणे व दुरुस्ती करुन रंगरंगोटी करणे. कामी रक्कम रु. **३४,५४,२९५**/- मात्रच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४ दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार प्रशासकिय ठराव व निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक सो. यांना आहेत.

ठराव क्र. ३८१ दिनांक :- ०५ /०३/२०२४

प्रभाग समिती क्र ०५ च्या कार्यक्षेत्रातील अन्वर बुबेरे सांस्कृतिक केंद्रावर पत्राशेड टाकणे व दुरुस्ती करुन रंगरंगोटी करणे. कामी रक्कम रु. **३४,५४,२९५**/- मात्रच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी **अजय वैद्य**, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी. प्रभाग समिती क्र ०५ च्या कार्यक्षेत्रातील अन्वर बुबेरे सांस्कृतिक केंद्रावर पत्राशेड टाकणे व दुरुस्ती करुन रंगरंगोटी करणे. कामी रक्कम रु **३४,५४,२९५**/- मात्रच्या कामाच्या प्रस्तावास मा.प्रशासकीय ठरावाची मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका